महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित

वृत्तपत्र कात्रणे

जनसंपर्क अधिकारी

वृत्तपत्राचे नांव- लोकमत (हॅलो मुंबई)

पान .क्र.- ०२

दिनांक- ०४/१०/२०२२

## भांडणात मध्यस्थी पडली महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भांडण सोडवण्यासाठी पुढाकार घेणे तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. मध्यस्थी केल्यामुळे दोघांनी त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला. ही घटना मानखुर्दमध्ये घडली असून याप्रकरणी ट्रॉम्बे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तसेच दोघांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मानखुर्द परिसरात राहणारे रमाकांत पतीराम यादव (३१) हे या हल्ल्यात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे. रविवारी रात्री एक ते दीडच्या सुमारास यादव हे महाराष्ट्रनगर येथून घरी जात असताना, मित्राच्या भांडणात मध्यस्थी घेतल्याच्या रागात आरोपींनी त्यांना वाटेत अडवून शिवीगाळ केली. तसेच जवळील कोयत्याने व लाकडी बांबूने यादव यांच्यावर प्राणघातक हल्ला चढवला. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी देत दोघे पसार झाले.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली, भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत यादव यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी फारुख आणि साखर शेख यांना अटक केली आहे. दरम्यान, याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# नव्या वर्षात मेट्रोने थेट गाठा अंधेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईच्या पश्चिम उपनगरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ उभारण्यात आली असून, या दोन्ही मेट्रो मार्गावर पहिल्या टप्प्यात मेट्रो धावत आहे.

आता मुंबईकरांना दुसऱ्या टप्प्यावरील मेट्रोची प्रतीक्षा असून, येत्या डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याचे काम संपेल आणि नव्या वर्षात प्रवाशांना मेट्रोतून प्रवास करता येईल, असा दावा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केला आहे.




**मेट्रो २ अ** — दहिसर पूर्व ते डीएन नगर — लांबी **१८.५ किमी**

**मेट्रो ७** — अंधेरी पूर्व आणि दहिसर पूर्व — लांबी **१६.५ किमी**




### प्रवाशांचे आरोग्य महत्त्वाचे आहे

- प्रवाशांच्या आरोग्याचीही काळजी घेतली जाते.
- मेट्रोमधून प्रवास करताना आरोग्याशी संबंधित समस्या निर्माण झाली, तर त्यासाठी मेट्रोची टीम सदैव तत्पर असते.
- संपूर्ण टीमला प्रथमोपचारासह सीपीआरचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- प्रत्येक स्थानकावर आठवड्यातून एकदा याचा सरावदेखील केला जातो.




मेट्रोफेज २ ची आरडीएसओची पाहणी सुरू झाली आहे. सिग्नलिंग, टेलिकॉम, इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल विभागाचे काम लवकरच संपेल. संपूर्ण टीमचा प्रयत्न हाच आहे की, डिसेंबरपर्यंत मेट्रोचे काम संपेल आणि नव्या वर्षात प्रवाशांना मेट्रोतून प्रवास करता येईल.

- एस. व्ही. आर. श्रीनिवास, अध्यक्ष, महा मुंबई मेट्रो

### गोरेगाव पूर्व ते गुंदवलीपर्यंत स्थानकांची तपासणी

- मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ चे काम वेगाने सुरू आहे. महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास सातत्याने या कामाची पाहणी करत आहेत. नुकतेच त्यांनी कॅटेनरी मेंटेनन्स व्हेईकलमधून प्रवास करत लाईन ७ वरील गोरेगाव पूर्व ते गुंदवलीपर्यंत स्थानकांची तपासणी केली.